# प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, (लोहमार्ग) न्यायालय, दौंड यांचे न्यायालयात.

फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २६० व २६३ प्रमाणे समरी फौजदारी खटल्याचे विवरण

**सं.फौ.ख.क.४७७/२०१४.**
**निशाणी :**

| | | |
|---|---|---|
| १. गुन्हा घडल्याची तारीख | : | ११/०२/२०१५. |
| २. फिर्याद दाखल तारीख | | ११/०२/२०१५. |
| ३. फिर्यादीचे नांव | : | श्री. ए. व्ही.पवार<br>आर.पी.एफ, सोलापूर |
| ४. आरोपीचे नांव | : | शुभम धनंजय ठाकुर<br>वय २० वर्षे, रा.सोलापूर. |
| ५. गुन्हा कलम | : | कलम १४४(१) रेल्वे अधिनियम कायदा, १९८९. |

**अपराधाचे विवरण —**

दिनांक ११/०२/२०१५ रोजी १७.३० वाजता तुम्ही सोलापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आलात व त्यानुसार तुम्ही कलम १४४ रेल्वे अधिनियम १९८९ नुसार शिक्षापात्र गुन्हा केलेला आहे.

**— आरोपीचे प्रतिकथन —**

प्र. १ : तुम्हाला दाखल केलेल्या फिर्यादीची नक्कल प्रत मिळाली काय?
उत्तर : होय.

प्र. २ : तुम्हाला वाचून दाखविलेल्या गुन्हयाचा तपशिल समजला आहे काय?
उत्तर : होय.

प्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तर : नाही, मला गुन्हा कबूल नाही.

आरोपीची सही.........................................

**समक्ष**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक : ११/०२/२०१५**

**फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क. १**

मी शपथपूर्वक कथन करतो ते येणेप्रमाणे :

माझे नांव : श्री. सचीन कुमार,
वय : ४० वर्षे, व्यवसाय : उप निरिक्षक, आर.पी.एफ, सोलापूर
राहण्याचे ठिकाण : सोलापूर.

**सहा. सरकारी वकील गैरहजर, सरतपास फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार स्वत:**

१. दिनांक ११/०२/२०१५ रोजी फिर्यादीश्री. ए. व्ही.पवार, आर.पी.एफ, सोलापूर यांनी फिर्याद दिली की, त्यांची डयुटी रेडकामी सोलापूर रेल्वे स्थानकावर असतांना आरोपी हा प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आला. त्याचेकडे फिर्यादीने परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने परवाना नसलेचे सांगितले. त्यानंतर फिर्यादीने त्याला पकडून माझेकडे आणले व लेखी फिर्याद दिली. मी फिर्यादीची फिर्याद लिहून घेतली असून त्यावर फिर्यादीची व माझी सही आहे. आता मला ती फिर्याद दाखविली असून ती तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास आता निशाणी ३ देण्यात आले. चौकशीअंती आरोपीने सोलापूर रेल्वे स्थानकावर विनापरवाना प्रवाशांना चहा विकलेचे निष्पन्न झाले. म्हणून मी आरोपीविरुद्व कलम १४४ रेल्वे अधिनियमानुसार फिर्याद दाखल केली. आरोपी आज रोजी उपस्थित आहे त्यास मी ओळखतो.

**उलटतपास आरोपी स्वत:**

२. हे म्हणणे खरे नाही की, सोलापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांना मी चहा विकले हे तुम्ही खोटे सांगत आहात. हे म्हणणे खरे नाही की, तुम्ही माझेवर खोटी केस केली आहे.

३. फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,** **समक्ष,**

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**
**दिनांक : ११/०२/२०१५.**

**फौजदारी प्रकिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचा जबाब.**

प्रश्न क्र. १ : फिर्यादी पक्षातर्फे झालेला साक्षीपुरावा तुम्ही ऐकला काय ?
उत्तर : होय.

प्रश्न क्र. २ : श्री. सचीन कुमार (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, दि. ११/०२/२०१५ रोजी १७.३० तुम्ही सोलापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना मिळून आलात याबाबत तुम्हांस काय सांगायचे आहे?
उत्तर : हे खोटे आहे.

प्रश्न क्र. ३ : सदर साक्षीदार तुमचेविरूध्द का साक्ष देतात?
उत्तर : मला माहित नाही.

प्रश्न क्र. ४ : तुम्हास स्वत:ला शपथेवर साक्ष द्यावयाची आहे का ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ५ : तुम्हास तुमचे बचावाकरीता साक्षीपुरावा दयावयाचा आहे काय ?
उत्तर : नाही.

प्रश्न क्र. ६ : सदर खटल्याबाबत तुम्हांस आणखी काही सांगावयाचे आहे काय?
उत्तर : नाही.

**समक्ष,**

आरोपीची सही.........................................

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक: १३/०२/२०१५.**

**<u>प्रमाणपत्र</u>**

वरील तपासणी माझेसमक्ष ऐकणेत व घेणेत आली असून आरोपीने दिलेला जबाब पूर्णपणे व सत्यतेने नोंदला गेलेला आहे.

**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

**दिनांक: १३/०२/२०१५.**

— मौखिक न्यायनिर्णय —
( पारित दिनांक १३ फेब्रुवारी, २०१५. )

१) आरोपीवर कलम १४४(१) रेल्वे अधिनियम १९८९ अन्वये आरोप ठेवण्यात आलेला आहे.

२) फिर्यादी पक्षाची संक्षिप्त हकिकत येणेप्रमाणे —

दिनांक ११/०२/२०१५ रोजी १७.३० वाजता आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असताना फिर्यादीश्री. ए. व्ही.पवार, आर. पी.एफ, सोलापूर यांना मिळून आली.

३) अपराधाचे विवरण आरोपीस वाचून दाखविले असता त्याने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व न्याय चौकशी करण्याची मागणी केली.

४) माझेसमक्ष खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झाले व त्यावर मी पुढीलप्रमाणे कारणामिमांसहित निष्कर्ष देत आहे.

| <u>**मुद्दे**</u> | <u>**निष्कर्ष**</u> |
| --- | --- |
| १. दिनांक ११/०२/२०१५ रोजी १७.३० वाजता आरोपी हा सोलापूर रेल्वे स्थानकावर विनापरवाना प्रवाशांना चहा विकत असतांना मिळून आल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केले आहे का ? | ... होय. |
| २. आदेश | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>*का र ण मि मां सा*</u>

५) <u>**मुद्दा क्रमांक १ :—**</u>

श्री. सचीन कुमार (फि.सा.१) यांचे साक्षीमध्ये असे आले आहे की, आरोपी हा दिनांक ११/०२/२०१५ रोजी १७.३० वाजता सोलापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत असतांना फिर्यादी श्री. ए. व्ही.पवार, आर.पी.एफ, सोलापूर यांना मिळून आला. त्यानंतर फिर्यादीने सदर आरोपीस चौकशी अधिकारी श्री. सचीन कुमार, उप निरिक्षक आर. पी.एफ, सोलापूर यांच्या हवाली केले व चौकशी अधिका—यांनी फिर्यादीची लेखी फिर्याद निशाणी क्र. ३ नोंदवून घेतली. आरोपी सोलापूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांना विनापरवाना चहा विकत होता ही बाब त्याने नाकारली आहे. परंतु उपरोक्त वेळी आरोपीची रेल्वेस्थानकावरील उपस्थिती तसेच त्याचे ताब्यातील इडली, वडयाचे प्रमाण नाकारलेले नाही.

तसेच फिर्यादी व चौकशी अधिका—यास आरोपीस खोटया प्रकरणात गोवण्याचे कोणतेही कारण आरोपीने अभिलेखावर आणलेले नाही. सबब चौकशी अधिका—याची साक्ष ही विश्वास निर्माण

करणारी आहे. सबब मी या निष्कर्षाप्रत पोहोचतो की, आरोपीने सोलापूर रेल्वेस्थानकावर प्रवाशांना विनापरवाना चहाची विक्री करुन कलम १४४ रेल्वे अधिनियमनुसार अपराध केला म्हणून मी मुद्दा क्र. १ चे उत्तर होकारार्थी देत आहे.

६) **मुद्दा क्रमांक २:—**

आरोपीस शिक्षेबाबत विचारले असता त्याने प्रार्थना केली आहे की, तो गरीब असून हा त्याचा पहिलाच गुन्हा आहे. त्याचेवर पूर्ण कुटुंबाची जबाबदारी आहे. तसेच तो कुटुंबातील एकटाच कमवता पुरुष आहे. सदरील आरोपीने पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिद्ध केलेले नाही. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिद्ध करीत नाही. गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे त्यामुळे प्रस्तुतचा गुन्हा आणि आरोपीच्या कौटुंबिक परिस्थितीचा विचार करता माझ्या मते आरोपीस दया दाखविणे योग्य वाटते. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

आरोपीस, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(२) अन्वये, कलम १४४ रेल्वे अधिनियम १९८९ या अपराधाखाली सिद्ध दोषी ठरविणेत येत असून त्याने सदर अपराधासाठी रुपये १५००/— (एकूण एक हजार पाचशे रुपये फक्त) दंड भरावा. दंड भरणेस कसूर केलेस ३० दिवसांची साध्या कैदेची शिक्षा भोगावी.

**सोलापूर येथील दौरा.**
**दिनांक: १३/२/२०१५.**

**( एम. आर. देशपांडे )**
**प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**

" I affirm that the contents of this PDF file Judgment are same word for word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | S.G.Datrange, |
| Court's Name | : | M. R. Deshpande, J.M.F.C.Railway Court, Daund. |
| Date | : | 13.2.2015. |
| Judgment signed by presiding officer on | : | 13.2.2015 . |
| Judgment uploaded on | :" | 20.02.2015._ |